cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६९ | मंगळवार दि.०८ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### हिंजवडीचा आक्रोश : आयटी हब की नियोजन शून्य कारभाराचा नमुना?

पुण्याच्या हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कचा उल्लेख झाला की महाराष्ट्राच्या आधुनिक विकासाचे चमकदार चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. देश–विदेशातील माहिती–तंत्रज्ञान कंपन्या, हजारो अभियंते आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार देणारे हे केंद्र महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा भाग आहे. पण ६ सप्टेंबर २०२६ रोजी हिंजवडीच्या रस्त्यावर उतरलेल्या ५,००० हून अधिक आयटी कर्मचारी आणि नागरिकांनी या विकासाच्या चमकदार चित्रामागील विदारक वास्तव सरकारसमोर ठेवले.

# खत अनुदानाचा अतिरिक्त भार घटणार

## युरियाच्या जागतिक दरातील घसरणीचा केंद्राला मोठा दिलासा; ३.४ लाख कोटींचा अंदाज बदलला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**जागतिक बाजारात खतांच्या किमती वाढल्याने केंद्र सरकारच्या खत अनुदानावरील खर्चात मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, आता युरियाच्या आंतरराष्ट्रीय किमतीत झालेल्या मोठ्या घसरणीमुळे सरकारला काहीसा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. खत अनुदानासाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या १.७ लाख कोटी रुपयांच्या तरतुदीपेक्षा आणखी ७० ते ८० हजार कोटी रुपयांची आवश्यकता भासू शकते. त्यामुळे यंदाचा एकूण खत अनुदान खर्च सुमारे २.४ ते २.५ लाख कोटी रुपयांपर्यंत राहण्याची शक्यता असल्याची माहिती केंद्रीय वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूत्रांनी दिली.**

यापूर्वी खत अनुदानाचा खर्च तब्बल ३.४ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, जागतिक बाजारात युरियाच्या दरात झालेली मोठी घसरण आणि देशातील खतांच्या मागणीत झालेली काहीशी घट यामुळे हा अतिरिक्त भार अपेक्षेपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.ङ्गएप्रिलमध्ये दर पोहोचले होते ९५९ डॉलरवर पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक खत पुरवठा साखळीवर परिणाम झाला होता. परिणामी युरियाच्या



किमतीत मोठी वाढ झाली. यंदा एप्रिलमध्ये जागतिक बाजारात युरियाचे दर तब्बल ९३५ ते ९५९ डॉलर प्रति टनांपर्यंत पोहोचले होते. ही किंमत मागील पातळीच्या तुलनेत जवळपास दुप्पट होती. आयात केलेल्या युरियाची किंमतही सुमारे ९०० डॉलर प्रति टनांपर्यंत गेल्याने केंद्र सरकारच्या अनुदानावरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता निर्माण झाली होती. मे महिन्यातही युरियाचे दर सरासरी ९४७ डॉलर प्रति टनांच्या आसपास राहिले. त्यामुळे सरकारच्या ▶▶ पान २ वर

# डॉक्टरांना ‘एकच विचारसरणी’ असलेल्या लोकांकडून मारहाण!

## महाराष्ट्रातील घटनांबाबत सुप्रीम कोर्टाची तीव्र नाराजी, या लोकांना मोकाट सोडू नका – सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रात डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हल्ल्यांच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अशा हल्ल्यांमागे ‘एकच विचारसरणी’ असलेले लोक असल्याचा थेट उल्लेख करत न्यायालयाने शिवसेना कार्यकर्त्यांकडून डॉक्टरांना झालेल्या मारहाणीच्या घटनांची गंभीर दखल घेतली. डॉक्टरांवर हल्ला करणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना तात्काळ ताब्यात घ्यावे, ते मोकाट फिरता कामा नयेत, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

६ जुलै रोजी कल्याण–डोंबिवली पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात आयसीयू बेड मिळण्यावरून म्हात्रे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी महिला डॉक्टरांसह तीन डॉक्टरांना मारहाण केली होती. ही घटना ताजी असतानाच पालघर येथील रिलीफ हॉस्पिटलमध्ये दहीहंडी महोत्सवादरम्यान जखमी झालेल्या एका रुग्णाला डिस्चार्ज देण्यावरून वाद उफाळून आला. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयातील आपत्कालीन विभागात घुसून डॉक्टरांशी हुज्जत घातली तसेच मध्यस्थी करणाऱ्या ▶▶ पान २ वर

# अजितदादांच्या विमान अपघात तपासावर मनोज जरांगे यांची शंका



जालना । प्रतिनिधी

अंतरवाली सराटी येथे उपोषणाच्या दहाव्या दिवशी आयोजित पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधत अनेक गंभीर सवाल उपस्थित केले. याच पत्रकार परिषदेत त्यांनी राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूबाबतही शंका व्यक्त करत या घटनेच्या तपासाबाबत शंका व्यक्त केली. अजित पवार यांच्या निधनाचा उल्लेख ▶▶ पान २ वर

### मराठा आरक्षणावरून सरकारला इशारा

पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारला चांगलेच धारेवर धरले. गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू असताना सरकारकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. सरकारकडून केवळ आश्वासने, बैठका आणि चर्चांच्या माध्यमातून वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा समाज आता सरकारच्या आश्वासनांवर विश्वास ठेवणार नाही; निर्णय हवा आणि त्याची अंमलबजावणी हवी, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली.

## थोडक्यात...

### प्रिती झिंटाच्या टी–शर्टवर ‘टीम तुकाराम मुंढे’

मुंबईः महाराष्ट्राचे अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. अनेक भेसळ कंपन्यांविरोधात त्यांनी कारवाईचा बडगा उगारला. ‘एफडीए’च्या टीमने अनेक दुकान आणि कंपन्यांमध्ये कारवाईचा सपाटा लावला. छोट्या स्टॉल्सपासून ते फाइव्ह स्टार हॉटेल्सवर धाडी टाकल्यानंतर पदार्थांचे रंगच बदलले. भेसळ नसलेले पदार्थ आता खवय्यांना खायला मिळत आहे. हे बदल घडल्यानंतर तुकाराम मुंढेंवर विशेष कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. सिनेकलाकारांनी तुकाराम मुंढे यांचे कौतुक केले. विशेषतः काही सिने कलाकार तुकाराम मुंढेंच्या कामाचे फॅन झाले आहेत. बऱ्याच मुलाखतींमध्ये तुकाराम मुंढेंचे कलाकारांकडून कौतुक केले जात आहे. रविना टंडन, ट्विंकल खन्ना , अशा लोकप्रिय सिने अभिनेत्रींनी तुकाराम मुंढेंच्या धडाकेबाज कामगिरीची प्रशंसा केली आहे. दरम्यान, आता ९० च्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री प्रिती झिंटा ही देखील तुकाराम मुंढेंची फॅन झाली असल्याचं दिसत आहे. तिचा एक व्हिडीओ सोशल मीडियात तुफान व्हायरल होत आहे.

### युट्युबर अजित भारतींना हायकोर्टचा झटका

दिल्ली : रक्षण सुधारणेबाबत भाष्य करणारे युट्युबर अजित भारती यांना दिल्ली न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये दाखल केलेल्या प्रकरणात न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज सोमवारी फेटाळून लावला. नगीना येथील खासदार चंद्रशेखर आझाद यांच्या आझाद समाज पक्ष (कांशीराम) च्या दिल्ली प्रदेशाध्यक्षांनी दिलेल्या तक्रारीवरून ऑगस्ट महिन्यात दिल्लीतील नॉर्थ एव्हेन्यू पोलीस ठाण्यात भारती यांच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. बार अँड बेंचच्या वृत्तानुसार, दिल्ली पोलिसांनी अजित भारती यांचा अटकपूर्व जामीन अर्ज दखल पात्र नसल्याचा युक्तिवाद केला. ‘‘केवळ गुन्हा दाखल झाला आहे म्हणून त्यांना अटक केली जाईल, अशी भीती बाळगण्याचे कारण नाही,‘‘ असे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. अजित भारती यांच्या वकिलाने न्यायालयात सांगितले की, त्यांनी कोणतीही जातिवाचक शिवीगाळ केलेली नसून, केवळ त्यांच्या कुटुंबातील सदस्याविरुद्ध झालेल्या गंभीर चिथावणीला प्रत्युत्तर दिले होते.तथापि, अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौरभ प्रताप सिंह यांनी भारती यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

### डीजेच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री तटस्थ भूमिकेत–संजय राऊत

मुंबईः शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी डीजेवरील बंदीच्या वादावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. ध्वनी प्रदूषणामुळे लोकांमध्ये संताप वाढत असतानाही फडणवीस यांनी या मुद्द्यावर कोणतीही ठोस भूमिका न घेता तटस्थ राहिले आहेत किंवा कुंपणावर बसले आहेत, असा आरोप राऊत यांनी केला. पत्रकारांशी बोलताना राऊत यांनी मुंबई आणि नागपूरच्या तुलनेत पुण्यात वेगळी वागणूक दिली जात असल्याचा आरोप केला. मुंबई आणि नागपूरमध्ये पोलीस प्रमुखांनी मोठ्या आवाजाच्या साऊंड सिस्टिम्सवर निर्बंध लागू केले आहेत. लोक रस्त्यावर उतरत आहेत आणि डीजे साऊंड सिस्टिम्समुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक व मानसिक समस्यांबद्दल बोलत आहेत. हे मुद्दे केवळ पुण्यापुरते मर्यादित नाहीत, तर त्यांचा संबंध संपूर्ण महाराष्ट्राशी आहे, असे ते म्हणाले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ३९.०० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,७०६ |
| ज्वारी/हायब्रिड : ९१.५० क्विंटल | १,८०१ | ४,३५० | ३,००५ |
| मका/लोकलः ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ३३.०० क्विंटल | ७,३०० | ८,२६० | ८,०६२ |
| उडीद : ९.५० क्विंटल | ३,३३० | ८,२९० | ६,६३३ |
| बाजरीः १६.५० क्विंटल | २,२४२ | २,९३० | २,६११ |
| मुगः १६.५० क्विंटल | ९,००० | ९,५०० | ९,३०९ |
| सोयाबीनः १२.५० क्विंटल | ६,००० | ६,१५३ | ६,१०२ |
| हरभराः ७.५० क्विंटल | ४,७९० | ६,९०० | ५,८२९ |

# ...तर तात्काळ राजिनामा देईन ; एमपीएससी अध्यक्षांचे स्पष्टीकरण




मुंबई । प्रतिनिधी

आपल्याविरोधात आरोप करणाऱ्यांनी पुरावे सादर करण्याचे आव्हान देत एमपीएससी अध्यक्ष भीमनवार म्हणाले, ‘‘माझ्याविरोधात कुणी एक जरी पुरावा दिला, तर एक क्षणसुद्धा मी या पदावर राहणार नाही.’’ एमपीएससीची प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता कायम ठेवणे हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावर आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे. या प्रकरणातील घटनाक्रम हा आपण आयोगाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, वस्तुस्थिती स्पष्ट करूनही आपल्याविरोधात सातत्याने वैयक्तिक ▶▶ पान २ वर

# शिवनेरीच्या पायथ्याशी ‘लँड जिहाद’; किरीट सोमय्यांचा खळबळजनक आरोप



पुणे । प्रतिनिधी

शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी सुरू असलेल्या कथित बांधकामावरून भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी प्रशासनावर टीका केली. किल्ल्याच्या परिसरात ‘लँड जिहाद’ सुरू असल्याचा आरोप करत, ‘‘प्रशासन व पुरातत्त्व विभागाने तातडीने योग्य ती कारवाई करावी; आठवडाभरात कारवाई न झाल्यास हिंदू संघटनांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल आणि त्यात आपण स्वतः सहभागी होऊ,‘‘ असा इशारा सोमय्या यांनी सोमवारी दिला.

सोमय्या यांनी शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी भेट देऊन संबंधित कामाची पाहणी केली. या वेळी प्रशासन तसेच पुरातत्त्व विभागाने याबाबत वेळेवर दखल का घेतली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ▶▶ पान २ वर

# फॉरेन्सिक अहवालामुळे राम मंदिर देणगी चोरी प्रकरणातील आरोपींच्या अडचणीत वाढ

अयोध्या । वृत्तसंस्था

राममंदिर देणगी चोरी प्रकरणातील फॉरेन्सिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर तुरुंगात असलेल्या आठही आरोपींच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी आरोपींचे जबाब पुन्हा नोंदवण्यासाठी तपास अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षकांनी विशेष न्यायाधीश (भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा) रजत वर्मा यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने हा अर्ज मंजूर केला आहे.

तपासादरम्यान आरोपींच्या ताब्यातून



जप्त करण्यात आलेली रोकड, नाणी, दागिने आणि इतर साहित्य फॉरेन्सिक तपासासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. या तपासाचा अहवाल आता पोलिसांना प्राप्त झाला आहे. फॉरेन्सिक अहवालातील माहितीबाबत पोलिसांनी ▶▶ पान २ वर

# हिंदू राष्ट्र’ म्हणजे विविधतेचा स्वीकार; मोहन भागवत यांची भूमिका



लंडन । वृत्तसेवा

‘हिंदू राष्ट्र’ म्हणजे कोणताही विशिष्ट धर्म, उपासनेची पद्धत किंवा जीवनशैली नव्हे, तर विविध विचार आणि विविधतेचा स्वीकार करणारी वृत्ती आहे, अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडली. लंडनमध्ये भारतीय वंशाच्या नागरिकांच्या मेळाव्याला संबोधित करताना त्यांनी हिंदू राष्ट्र, हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि तरुणांच्या भूमिकेसह विविध विषयांवर भाष्य केले.

प्रश्नोत्तराच्या सत्रात हिंदू राष्ट्र आणि हिंदुत्वाच्या संकल्पनेवर बोलताना भागवत यांनी ‘हिंदू’ हा शब्द केवळ धार्मिक प्रथा किंवा विशिष्ट जीवनपद्धतीपुरता मर्यादित नसल्याचे सांगितले. विविधतेचा आदर करणे आणि ती स्वीकारणे हा हिंदू वृत्तीचा मूलभूत स्वभाव असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारतात नास्तिकतेसह विविध विचारधारा विकसित झाल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीचा मार्ग ▶▶ पान २ वर

# दोन्ही राष्ट्रवादींच्या विलिनीकरणाच्या चर्चांना वेग ; भाजपकडून हालचाली

## सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्याशी चर्चा; शरद पवार गटाशीही जवळीक वाढवण्याचे प्रयत्न

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र आणण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही गटांचे विलिनीकरण व्हावे, यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याशी भाजपकडून चर्चा सुरू असून, या निर्णयाबाबत त्यांना लवकर निर्णय घेण्याची मुदत देण्यात आल्याचीही चर्चा आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, अशी भाजपची भूमिका असल्याचे सांगितले जात आहे. एका बाजूला सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याशी चर्चा सुरू असतानाच दुसऱ्या बाजूला शरद पवार यांच्या गटाशी जवळीक वाढविण्याचे प्रयत्नही सुरू असल्याची माहिती आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे भवितव्य आणि आगामी राजकीय समीकरणे याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.**



सूत्रांच्या माहितीनुसार, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांचा विलिनीकरणाच्या निर्णयाला विरोध असल्याची चर्चा आहे. मात्र, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांच्यासह राष्ट्रवादीतील काही मंत्री आणि आमदार विलिनीकरणाच्या बाजूने असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पक्षांतर्गत मतभेदांमुळे या निर्णयाची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मागील आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासोबत विलिनीकरणाच्या मुद्द्यावर बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत राष्ट्रवादीच्या भविष्यातील नेतृत्वासह दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडूनही दोन्ही राष्ट्रवादींना पुन्हा एकत्र ▶▶ पान २ वर

# मराठा आरक्षणावर राज्य सरकारचे ४ मोठे निर्णय

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकार ४ महत्त्वाचे निर्णय घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयांद्वारे मराठा, कुणबी आणि एसइबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती, वसतिगृह भत्ता, परदेश शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी देणारा मोठा दिलासा देण्यात येणार आहे. लवकरच याबाबतचा शासन आदेश जारी केला जाईल, अशी माहिती उच्चपदस्थ सूत्रांकडून देण्यात आली आहे.**

मराठा समाजाला ओबीसी प्रमाणे शैक्षणिक सवलती, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास वर्ग प्रवर्गाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयी–सुविधा आणि सवलतींचा लाभ तातडीने लागू करण्याचे तंत्रशिक्षण संचालनालयाने सर्व विद्यापीठांना आदेश वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींचा निधी इबीसी, इडब्ल्यूएस आणि एसइबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित डॉ. पंजाबराव देशमुख ▶▶ पान २ वर

cmyk

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०८ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात



### पिंपळवंडी जिल्हा परिषद शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ मध्ये शिष्यवृत्ती,नवोदय व मंथन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल सर्व यशस्वी पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतीचिन्ह,प्रमाणपत्र देऊन दि.०१/०९/२०२६ रोजी गौरव करण्यात येऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप पवार व प्रमुख पाहुणे उपसरपंच दादासाहेब पवार,युवा नेते अशोक पवार, मुख्याध्यापक शहाजी येवले आदी होते.विविध परीक्षेत या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचे,पालकांचे,गावचे नाव उज्वल केले.त्यांच्या घवघवीत यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत,पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे.गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी शिष्यवृत्ती पात्र मध्ये स्नेहल सचिन पवार,यशश्री सूर्यकांत उकांडे, कल्याणी सतीश पवार,कोमल मच्छिंद्र शिंदे,धनश्री सतीश कांबळे,प्रियंका लहू जाधव,श्रेया भिमा शिंदे इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पात्र सृष्टी सुशीलकुमार सुरवसे,विद्या महेश पोकळे,इयत्ता सातवी वैष्णवी सचिन पवार,ईश्वरी अमोल दगडे,सुरज संपत घोळवे,आदित्य बाळू सप्रे,सुप्रिया कैलास गुरसाळे,मंथन मध्ये आर्या युवराज पवार,श्रावणी बाजीराव पवार,ऋतुजा रविकिरण पोकळे तसेच आरव नारायण नरसाळे,सार्थक अशोक पवार,तन्वी संदीपान तरटे,फातेमा रफिक शेख,रविराज भास्कर खोटे आदींनी यश संपादन केले आहे.याप्रसंगी वैजिनाथ पवार,शेख रफिक,सौ.वर्षा उकांडे,नारायण नरसाळे सर,एस.आर.पवार सर यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला नरहरी वाघमारे,देविदास पवार,महेश पोकळे,पत्रकार बबनराव उकांडे,के.टी.पवार,सतीश कांबळे,सचिन पवार,रामराव पवार,संपत घोळवे,बाजीराव पवार,राणी दगडे,उमा पवार,अंजली पवार,अर्चना पवार,शितल पवार आदीसह पालक-माता उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी नरसाळे सर,एस.आर.पवार सर,बी.आर.पवार सर,लटपटे सर, नवले मॅडम,होळकर मॅडम,वाघमारे मॅडम,समृद्धी पटवा मॅडम आदींनी परिश्रम घेतले.



### कमी खर्चातील पोषक पाककृती व पोस्टर प्रदर्शनातून पोषण जनजागृती- डॉ. अरूणा केंद्रे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रीय पोषण माह निमित्त वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, अंबाजोगाई येथे शासकीय नर्सिंग कॉलेज, लोखंडी सावरगावच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींच्या वतीने कमी खर्चातील पोषक पाककृती व पोस्टर प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन वैद्यकीय अधीक्षिका डॉ. अरुणा केंद्रे (दहिफळे) यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य श्रीधर भांगे,डॉ. राघवेंद्र देशमुख, डॉ. गोरे, सहाय्यक अधीसेविका श्रीमती कौसरबानू शेख,आणि गुणवंत रसाळ, सर्व परिसेविका, अधिपरीचारिका व इतर अधिकारी व कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रदर्शनात विद्यार्थिनींनी कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या स्थानिक व पौष्टिक पदार्थांपासून तयार केलेल्या विविध पाककृती सादर केल्या. तसेच पोषणविषयक संदेश देणाऱ्या आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये आहार व पोषणाबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना संतुलित आहार, पौष्टिक आहाराचे महत्त्व, विविध अन्नघटकांची गरज तसेच कमी खर्चात पौष्टिक आहार कसा तयार करता येतो याबाबतीत विस्तृत माहिती दिली. या उपक्रमाला रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नर्सिंग कॉलेजचे प्राध्यापक माधव सरवडे, विशाल शिंदे, अशित तरकसे व श्रीमती शितल मुंडे यांनी विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन केले.

# भाजी मंडईतील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्सचा खेळ खंडोबा

## भव्य सभागृहचे गाळे पाडून विक्रीचा डाव

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या मालकीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग कॉम्प्लेक्स येथील हॉलचे गाळ्यांमध्ये रूपांतर करून ते इतरांना विक्री अथवा हस्तांतरित करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नगरपरिषदेच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप असून, कर अधीक्षक तथा उपमुख्याधिकारी विश्वंभर तिडके यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर हॉलमध्ये यापूर्वी सर्वसामान्य तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील नागरिकांकडून वाढदिवस, विवाह व इतर सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जात होते. मात्र, नगरपरिषदेच्या मालकीच्या या हॉलचे गाळ्यांमध्ये रूपांतर करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तापडिया व दिनेश मुंदडा यांनी हे गाळे इतरांना विक्री अथवा हस्तांतरित केल्याचा आरोप असून, त्यासाठी नगरपरिषदेची अधिकृत परवानगी, ठराव किंवा कायदेशीर प्रक्रिया झाली होती का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.



या प्रकरणात नगरपरिषदेच्या मालमत्ता नोंदवही, मंजूर बांधकाम आराखडा, भाडेपट्टा, लिलाव प्रक्रिया, हस्तांतरण परवानगी तसेच संबंधित गाळ्यांची कर आकारणी यांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. गाळ्यांचा वापर होत असताना त्यानुसार मालमत्ता कर, भाडे, वापर शुल्क किंवा इतर देयके नगरपरिषदेकडे जमा झाली आहेत का, याचीही चौकशी करण्याची मागणी आहे.

दरम्यान, विश्वंभर तिडके, कर अधीक्षक तथा उपमुख्याधिकारी यांना सदर प्रकरणाची माहिती असतानाही संबंधितांना नोटीस बजावण्यात आली नाही किंवा आवश्यक करआकारणी व कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या महसुलाचे नुकसान झाले असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी व व्यक्तींकडून नुकसान वसूल करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच कॉम्प्लेक्सच्या नावाबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग कॉम्प्लेक्स असे अधिकृत नाव असताना तापडिया हॉल असे नाव वापरण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. यापूर्वी मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांच्याकडे तक्रार केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव पुन्हा ठळक अक्षरात लावण्यात आले.

या संपूर्ण प्रकरणाची विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि नगर परिषद प्रशासन विभागाच्या स्तरावर स्वतंत्र चौकशी, प्रत्यक्ष स्थळ पाहणी, मालमत्ता व कर अभिलेखांची तपासणी तसेच नगरपरिषदेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीचे विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत गैरव्यवहार अथवा अनधिकृत हस्तांतरण आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशीही मागणी वंचितचे मा. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

# सात वर्षांची परंपरा अन् एकतेचा उत्सव

## दिंद्रुडमध्ये दहीहंडी महोत्सव उत्साहात; जात-धर्म-पंथ बाजूला ठेवून ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील बाजार तळावर शासकीय धान्य गोडाऊनच्या शेजारी सात वर्षांची परंपरा जपत दहीहंडी महोत्सव काल शनिवारी (दि.०५) मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या उत्सवाच्या निमित्ताने गावातील नागरिकांनी एकत्र येत सामाजिक एकतेचा सुंदर संदेश दिला. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकाने मानवी मनोरे रचत उपस्थितांची मने जिंकली. ढोल-ताशांचा गजर, उत्साहपूर्ण वातावरण आणि 'गोविंदा आला रे...'च्या जयघोषाने संपूर्ण बाजार तळ दुमदुमून गेला. दहीहंडी फोडण्याच्या क्षणाची उत्सुकता उपस्थितांमध्ये शिगेला पोहोचली होती.



विशेष म्हणजे जात, धर्म आणि पंथ बाजूला ठेवून ग्रामस्थांनी या उत्सवात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. युवकांसह ज्येष्ठ नागरिक आणि बालगोपालांनीही उत्सवाचा आनंद घेतला. त्यामुळे दहीहंडी हा केवळ धार्मिक उत्सव न राहता गावातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा उत्सव ठरला. गेल्या सात वर्षांपासून दिंद्रुडमध्ये दहीहंडी महोत्सवाची ही परंपरा सुरू असून, दरवर्षी या उत्सवाला ग्रामस्थांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. विविध जाती-धर्मातील नागरिकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा केल्याने दिंद्रुडच्या सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. उत्सवात माजी सरपंच अजय कोमटवार यांच्या वतीने ५५५५ रुपयांचे प्रथम बक्षीस तर आई प्रतिष्ठानचे संजय सपाटे यांच्या वतीने ३३३३ रुपयांचे द्वितीय बक्षीस ठेवण्यात आले होते. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक विठ्ठल गवळी, काशीनाथ खांडेकर, सिध्देश्वर कटारे, उत्सवाचे अध्यक्ष सुभाष चांदबोधले, उपाध्यक्ष सुनील ठोंबरे यांच्यासह आदिंनी परिश्रम घेतले. एकता गोविंदा पथकातील मनोज साखरे, नितीन मुसळे, रोहित देशमाने, आदित्य मुसळे, अलीम शेख, महादेव आढाव, अजय गवळी, वैभव देशमाने, ओमकार माने, विकी देशमाने, अमोल देशमाने, राहुल मोरे आदिंनी तीन थर रचून दहीहंडी फोडली. उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण गावात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

बालगोपालांसाठी प्रथमच छोट्या दहीहंडीचे आयोजन -

बाजारतळावरील दहीहंडी पाहण्यासाठी दरवर्षी शेकडो बालकांची उपस्थिती असते. या लहान बालगोपालांना पारंपरिक सणाच्या उत्साहात सहभागी होता यावे, या उद्देशाने यंदा प्रथमच त्यांच्यासाठी स्वतंत्र छोट्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले. बालगोपालांनी मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडत सणाचा आनंद लुटला.

## पान ६ वरून...

### पाणबुडी मोटार चोरणारे

अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोलीस हवालदार अशोक दुबाले, आनंद मस्के, सोमनाथ गायकवाड, बालासाहेब सानप, पोलीस अंमलदार अश्विनकुमार सुरवसे व चालक पोलीस शिपाई सिद्धार्थ मांजरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### 'आरक्षण द्या, अन्यथा गप्प

प्रतिकूल आल्यास धनगर समाजाला एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाने पर्यायी 'प्लॅन बी' तयार ठेवावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करावा, देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर किमान २१ सदस्यांची नियुक्ती करावी आणि अध्यक्षपद धनगर समाजातील व्यक्तीला द्यावे, अशी मागणी करण्यात आली. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील 'मिसिंग लिंक'ला स्वातंत्र्यवीर सिंगोबा धनगर यांचे नाव देण्याची तसेच चंचगोट रेल्वे स्थानकाचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.शासनाने धनगर समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा सकल धनगर समाजाच्या वतीने देण्यात आला. 'आरक्षण आमचा हक्क आहे, आश्वासन नको; अंमलबजावणी हवी', या भूमिकेतून आंदोलनकर्त्यांनी शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

### बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

'टक्केवारीचे' सरकार आहे. काही मोजक्या लोकांमुळे आज बीड बदनाम होत आहे.

हे 'सॅटेलाइट' सरकार, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ: आमदार कैलास पाटील

आमदार कैलास पाटील यांनी महावितरण आणि राज्य सरकारच्या कारभाराचा चांगलाच समाचार घेतला. हे राज्य सरकार सॅटेलाइट सरकार आहे. बीड जिल्ह्यात एका तरी गावात सलग ८ तास वीज मिळून दाखवावी, असल्यास आम्ही संबंधित अभियंत्यांचा सत्कार करू. मराठवाड्यातील जनतेच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. शेतकऱ्यांचे बळी गेल्यावर सरकारला जाग येणार का? जोपर्यंत जनता जाब विचारणार नाही, तोपर्यंत हे सरकार वठणीवर येणार नाही. यापुढे यापेक्षा तीव्र आणि 'शिवसेना स्टाईल'ने आंदोलन छेडले जाईल.

आंदोलनाच्या धाकाने प्रशासनाला जाग :

शिवसेनेच्या या आंदोलनाचा धसका घेत प्रशासनाने तत्परता दाखवल्याचे चित्र दिसून आले. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम म्हणाले की, शिवसेना आंदोलन करणार या एका दणक्याने कस्तुरबा गांधी वसतिगृहाचा प्रश्न सुटून तेथे विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला.

तर जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी जलजीवन योजनेत भाजप सरकारकडून बोगस पैसे उचलल्याचा आरोप करत या भ्रष्टाचाराप्रकरणी शिंदे सरकार, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर (उएज) थेट गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

प्रमुख मागण्या:

* बीड जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा. * जलजीवन मिशन योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत. * शेतीसाठी नियमित आणि पुरेशी वीज उपलब्ध करून द्यावी. * बीड शहर व जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा. या जनआंदोलनामुळे प्रशासनाचे चांगलेच धाबे दणाणले असून सरकारने तातडीने मागण्या मान्य न केल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

### १६ सप्टेंबर ला उपजिल्हाधिकारी

पाठीशी उभे राहण्याची जबाबदारी कारखानदारांचीही आहे. गेल्या वर्षीच्या ऊस दरातील फरकाची प्रलंबित असलेली प्रति टन २५० रुपये रक्कम शेतकऱ्यांना मदत म्हणून तातडीने अदा करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, संजय गांधी निराधार योजनेसाठी ऑनलाइन अर्ज केलेल्या पात्र लाभार्थ्यांना तातडीने मंजुरी देऊन त्यांना पेन्शन सुरू करावी तसेच २,५०० निराधारांना दरमहा पेन्शन मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या विविध मागण्यांसाठी दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी शेतकरी, शेतमजूर व निराधारांचा मोर्चा माजलगाव उपजिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.शेतकरी नेते - भाई गंगाभिषण थावरे

शेतकरी संघर्ष समिती, बीड

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

आजी-माजी सर्व लोकप्रतिनिधींनी धरणाची उंची वाढविण्याच्या प्रश्नावर आपली भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन शेतकऱ्यांनी केले आहे.धरणाची उंची वाढवू देणार नाही; गाळ काढा, पाणीसाठा वाढवा आणि शेतकऱ्यांची जमीन वाचवा असा निर्धार हजारो शेतकऱ्यांनी बैठकीत व्यक्त केला. यासंदर्भात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री आमदार प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे यांच्या विरोधात आंदोलन व तसेच गेवराई आजी माजी लोकप्रतिनिधी च्या भूमिका अस्पष्ट करावी असे आवाहन युवा शेतकरी संघर्ष समितीने केले आहे.

# वयोवृद्ध मिल कामगार सोपान शेंडगे यांचा विलास महाराज यांच्या हस्ते सत्कार

चौसाळा (प्रतिनिधी)

चौसाळा येथून जवळच असलेल्या कानडी घाट येथील वयोवृद्ध मिल कामगार सोपान तुळशीराम शेंडगे यांच्या वयाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याने अमृत महोत्सवी दिन म्हणून त्यांचा गावातील जेष्ठ कार्यकर्ते विलास महाराज शिंदे यांनी आवर्जून त्यांचा जाहीर सत्कार करून त्यांना सन्मानित केले या सत्कार समारंभात स्थानिक चे पत्रकार एन टी वाघमारे यांनी स्पष्ट केले की आजकालच्या युगात अनेक सत्कार होतात तथापि एक वयोवृद्ध व्यक्ती मुंबईसारख्या जागी राहून मिल बंद झाल्याने पुन्हा आपल्या गावी परत आले व त्यांनी कसलाही कुणाचा आधार



नसताना केवळ पती-पत्नी दोघांनीच मिळून पुन्हा आपला संसार आपल्या मूळ गावी येऊन थाटला तर नुकतीच त्यांची व्यवसाय करणारी पान टपरी अज्ञात इसमानी जाळली त्याला न डगमगता त्यांनी पुन्हा आपला प्रपंच पुन्हा नव्याने पान टपरी टाकून सुरू केला ही बाब उल्लेखनीय आहे अशा माणसाला समाजाने सहकार्य करून त्याला त्याच्या जीवनात उभारी द्यावी असे आपले मत स्पष्ट केले या सत्कार समारंभाला रिपाई चे ज्येष्ठ नेते बापू पवार व्यापारी अंगद नाईकवाडे भारत भवर पत्रकार विकास सर्वज्ञ यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# पिंपळनेर पोलिसांच्या मध्यस्थीने हिवरापहाडी येथील शेतकऱ्यांचा बांधावरील वाद मिटला

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील हिवरापहाडी येथे दोन शेतकऱ्यांमध्ये शेतीच्या बांधावरून सुरू असलेला वाद पिंपळनेर पोलिसांनी मध्यस्थी करत सामोपचाराने मिटवला आहे. वेळेत केलेल्या या हस्तक्षेपामुळे संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याने ग्रामस्थांनी पोलिसांच्या भूमिकेचे कौतुक केले आहे.



पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिवरापहाडी गावात शेजारी असलेल्या दोन शेतकऱ्यांमध्ये शेतीची हद्द, वहिवाटीचा रस्ता आणि जनावरे चारण्याच्या कारणावरून सातत्याने वाद होत होता. याप्रकरणी दोन्ही बाजूंकडून पोलीस ठाण्यात परस्पर तक्रारी दाखल झाल्या होत्या. या वादातून गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

घटनेचे गांभीर्य ओळखून पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवडे यांनी तात्काळ पावले उचलली. सपोनि नरवडे यांनी पोलीस कर्मचारी बाळासाहेब वनवे, सादिक पठाण, होमगार्ड राजेंद्र भोसले, स्थानिक पोलीस पाटील आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांना सोबत घेऊन थेट हिवरापहाडी येथील वादग्रस्त बांधावर धाव घेतली.

घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर पोलिसांनी दोन्ही शेतकऱ्यांना समोरासमोर बसवून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. कायदा व सुव्यवस्थेचे महत्त्व पटवून देत सामोपचाराने चर्चा घडवून आणली, ज्यामुळे दोन्ही पक्षांनी वाद मिटवण्यास सहमती दर्शवली. किरकोळ वादाचे मोठ्या संघर्षात रूपांतर होऊ न देता बांधावर जाऊन तोडगा काढल्याबद्दल शेतकरी आणि ग्रामस्थांकडून पिंपळनेर पोलिसांचे आभार मानले जात आहेत.

# शासकीय धान्य गोदाम हमालांच्या विविध मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

## माथाडी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, मजुरीतील तफावत दूर करण्यासह प्रलंबित मागण्यांसाठी २८ सप्टेंबरला पुण्यात धरणे आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

शासकीय धान्य गोदामांमध्ये काम करणाऱ्या हमाल-माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शासकीय धान्य गोदाम हमाल माथाडी कामगार संघटनांची संयुक्त कृती समिती आक्रमक झाली असून, आपल्या मागण्यांसाठी २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता कॉन्सिल हॉल पुणे येथे राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच कामगार मंत्री यांच्यासह संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माजलगाव तहसिलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे. प्रसंगी हमाल माथाडी कामगार वैजनाथ शिंदे दशरथ शिंदे पांडुरंग शिंदे ज्योतिराम खामकर देविदास होके राजेभाऊ वाघमारे भिमा होके विजय साळवे गोविंद होके वैभव पारवे यांची उपस्थिती होती.

संयुक्त कृती समितीने दिलेल्या निवेदनात शासकीय धान्य गोदामातील हमाल-माथाडी कामगारांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. माथाडी कायदा व शासनाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे कामगारांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. निवेदनातील प्रमुख मागण्यांनुसार, वाहतूक धोरणाची अंमलबजावणी करताना केवळ काही मोजक्या राज्यांमध्ये झालेल्या अंमलबजावणीचे अनुकरण न करता राज्यातील सर्व शासकीय धान्य गोदामांमध्ये माथाडी कामगारांना रोजगार मिळेल, अशा पद्धतीने धोरण



राबवावे, वाहतूक कंत्राटदारांच्या सोयीसाठी माथाडी कामगारांचा रोजगार धोक्यात येईल, अशा पद्धतीने धोरणाची अंमलबजावणी करू नये, असेही समितीने म्हटले आहे.

माथाडी कायद्यानुसार रोजगार व कल्याणकारी योजनांची मागणी

राज्यातील माथाडी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून माथाडी कामगारांना रोजगार व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून द्यावा, गोदामांमध्ये यंत्राद्वारे होणाऱ्या हाताळणीच्या कामामुळे कामगारांच्या रोजगारावर परिणाम होत असल्याने, धान्याची हाताळणी थेट वाहतुकीत होणार असल्यास गोदामातील नोंदणीकृत माथाडी कामगारांना रोजगार मिळण्याची व्यवस्था करावी, तसेच माथाडी कामगारांची मजुरी निश्चित करण्याचा अधिकार माथाडी मंडळाला असल्याचे नमूद करत, मंडळाने निश्चित केलेल्या दरानुसार मजुरी व त्यावरील लेव्ही माथाडी मंडळाकडे भरण्याची जबाबदारी वाहतूक कंत्राटदारांवर निश्चित करावी आणि त्यासाठी संबंधित विभागाने शुद्धीपत्रक काढावे,

महागाई निर्देशांकानुसार मजुरी देण्याची मागणी

शासकीय धान्य गोदामातील हमाल-माथाडी कामगारांना शासनाने मान्य केलेल्या महागाई निर्देशांकानुसार मजुरी मिळावी, त्यासाठी माथाडी मंडळाकडून संबंधित कंत्राटदारांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत, कामगारांकडून काम करून घेतल्यानंतर सहा-सहा महिने मजुरी व लेव्ही दिली जात नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे कामगारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, दरमहा मजुरी व लेव्ही वेळेवर मिळण्याची व्यवस्था करावी व तसेच मजुरी व लेव्हीच्या विलंबासाठी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक कार्यवाही करावी,

हमाल-माथाडी कामगारांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे. या आंदोलनानंतरही मागण्यांची दखल न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

शासकीय धान्य गोदामांमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या माथाडी हमालांच्या रोजगाराचा प्रश्न, मजुरीतील तफावत, लेव्हीचा विलंब आणि माथाडी कायद्याची अंमलबजावणी यांसारखे प्रश्न थेट कामगारांच्या उपजीविकेशी संबंधित असल्याने शासनाने आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कामगार वर्गातून व्यक्त होत आहे.

cmyk

# राजस्थानातील आणखी ११ जिल्ह्यांत डिजिटल खत

जयपूर / वृत्तसंस्था

राजस्थान सरकारने अनुदानित खतांची डिजिटल विक्री व्यवस्था आणखी ११ जिल्ह्यांत लागू केली आहे. ही व्यवस्था पारदर्शक असून शेतकऱ्यांना वेळेत खत उपलब्ध करून देणारी असल्याचा सरकारचा दावा आहे. मात्र, तांत्रिक अडचणी आणि सर्व्हर डाऊनमुळे शेतकऱ्यांना त्रास होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

२७ ऑगस्टपासून बारां, दौसा, हनुमानगड, डुंगरपूर, जालोर, झालावाड, करौली, कोटा, प्रतापगड, सवाई माधोपूर आणि टोंक या ११ जिल्ह्यांत डीबीटी-पॉस प्रणाली लागू करण्यात आली आहे. यापूर्वी दोन टप्प्यांत राज्यातील सात जिल्ह्यांत ही डिजिटल खत विक्री व्यवस्था लागू करण्यात आली होती. पहिल्या दोन टप्प्यांचे निकाल सकारात्मक आणि उत्साह वाढवणारे असल्याचे



कृषी विभागाचे अधिकारी सांगतात. आतापर्यंत एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी या प्रणालीद्वारे सुमारे १५ हजार टन युरियाचे बुकिंग केले आहे. डिजिटल बुकिंग प्रक्रिया सोपी, सोयीची आणि उपयुक्त असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे. राजस्थानचे कृषी आयुक्त नरेश कुमार गोयल यांनी सांगितले की, सरकार शेतकऱ्यांना युरिया प्रति गोणी २६७ रुपये या निश्चित दराने उपलब्ध करून देते. प्रत्येक गोणीमागे सरकारकडून सुमारे १ हजार ६०० रुपयांचे अनुदान दिले जाते. दुसरीकडे, औद्योगिक दर्जाच्या युरियाची किंमत २ हजार ५०० रुपयांपेक्षा जास्त असल्याने अनुदानित युरियाचा काळाबाजार आणि अनधिकृत वापर होण्याचा धोका असल्याचा सरकारचा दावा आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत यांनी ऑनलाइन बुकिंग व्यवस्थेवर टीका केली आहे. तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन आणि तासनतास लागणाऱ्या रांगा यामुळे शेतकऱ्यांना खत न मिळताच परतावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी जैविक उपाय



कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोमकळ्याच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासुनच दिसून येतो सततचे ढगाळ वातावरण पिकावरील किडींना पोषक असते. किडींच्या व्यवस्थापनामधे उशिर केल्यास या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढण्याची शक्यता असते म्हणून सुरूवातीपासुनच या किडींचे व्यवस्थापन करून ह्या किडीमुळे होणारे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते. त्यासाठी खालील उपाययोजनांचा अवलंब करावा.

कमी खर्चाच्या सोप्या उपाययोजना : पिकातील डोमकळ्या नियमित शोधून त्या अळीसहीत नष्ट कराव्या म्हणजे पुढील पिढ्यांची रोकथाम करता येईल. दर पंधरा दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अॅझेडिरेक्टिन ३०० पीपीएम ५० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. उगवणीनंतर ४० ते ४५ दिवसानंतर पिकामध्ये कामगंध सापळ्याचा वापर करावा. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार/उंचीनुसार किमान एक फुट अंतर ठेवावे जेणेकरून कामगंध सापळयाचा प्रभाव वातावरणात पसरण्यास मदत होईल. यासाठी एकरी दोन कामगंध सापळे लावावे. सतत तीन दिवस या सापळ्यामधे आठ ते दहा पतंग आढळल्यास गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाचे उपाय योजावेत तसेच मास ट्रॅपिंग करीता हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावेत. पीक उगवणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी १२ ते १५ दिवसांच्या अंतराने ट्रायकोग्रामा टॉयडीयाबॅक्ट्री किंवा ट्रायकोग्रामा चिलोनिस परोपजीवी मित्र किटकाची १.५ लक्ष अंडी प्रति हेक्टरी सहा वेळा सोडावे. गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक आठवड्याला एकरी शेताचे प्रतिनीधीत्व करतील अशी २० झाडे निवडून निवडलेल्या प्रत्येक झाडावरील फुले, पात्या व बोंडांची संख्या मोजून त्यात गुलाबी बोंड अळीग्रस्त फुले, पात्या व बोंडे यांची टक्केवारी काढावी. प्रादुर्भावग्रस्ताची टक्केवारी ५ टक्के पेक्षा जास्त आढळल्यासच रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी.

## चाऱ्याची टंचाई भासणार नाही ; मुरघासातून करा वर्षभराच्या चाऱ्याचे नियोजन

यंदा पाऊस कमी आहे. येत्या काळातही पाऊस कमीच राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे सध्या जनावरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची भीती अनेकांच्या मनात आहे. अशा परिस्थितीत कमी कालावधीत, कमी खर्चात तयार होणारा, जास्त काळ टिकणारा आणि पोषणमूल्य असलेला मुरघास फायदेशीर ठरतो. मुरघास तयार करून शेतकरी जवळपास वर्षभराच्या चाऱ्याचे नियोजन करू शकतात.

मुरघास हा सहसा मका, ज्वारी, बाजरी या पिकांपासून बनवला जातो. मक्याचे पीक पोटरीवर येऊन दाणे दुधाळ अवस्थेत असताना कापावे. ज्वारी आणि बाजरीचे पीक फुलोऱ्यावर असताना कापणी करावी. चाऱ्याची कुट्टी करून ही कुट्टी मुरघासाच्या खड्ड्यात थराने भरावी. प्रत्येक थर भरताना त्यावर चांगला दाब द्यावा. कुट्टीमध्ये हवा राहणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. हवा राहिल्यास बुरशी वाढून मुरघास खराब होऊ शकतो. चांगल्या प्रतीचा मुरघास तयार करण्यासाठी १.५ टक्के गुळाचे पाणी आणि १ टक्का युरिया पाण्यात मिसळून कुट्टीच्या प्रत्येक थरावर फवारावे. चांगल्या प्रतीच्या मुरघासाला आंबट वास येतो. त्याचा रंग फिकट हिरवा किंवा तपकिरी असतो. मुरघासाचा सामू साधारण ३.५ ते ४.५ असतो. खड्डा पूर्ण भरल्यानंतर त्याच्या पृष्ठभागावर एक ते दोन फूट उंच वैरणीचा ढिग करावा. त्यावर निरुपयोगी गवत किंवा कडब्याच्या पेंड्याचा थर द्यावा. त्यानंतर शेण आणि चिखलाच्या मिश्रणाचा थर देऊन खड्डा पूर्णपणे झाकावा. त्यावर पॉलिथिन अंथरूनही हवाबंद करता येते. मुरघास तयार होण्यासाठी साधारण ४५ ते ६० दिवस लागतात. त्यानंतर खड्ड्याच्या एका बाजूला छिद्र करून दररोज आवश्यक तेवढाच मुरघास काढावा. मुरघास काढल्यानंतर उघडलेला भाग पुन्हा वाळलेले गवत किंवा अन्य साहित्याने झाकून ठेवावा.

कुट्टीतील ओलावा : मुरघास तयार करताना चाऱ्यातील ओलावा महत्त्वाचा असतो. चाऱ्यात साधारण ६५ ते ७० टक्के पाण्याचे प्रमाण असणे योग्य आहे. त्यापेक्षा जास्त पाणी असल्यास कुट्टी दोन ते चार तास सुकू द्यावी. जास्त ओलाव्यामुळे मुरघास सडण्याची शक्यता असते. बॅगेत मुरघास तयार करताना कुट्टी भरल्यानंतर ती व्यवस्थित दाबावी आणि बॅगमधील हवा पूर्णपणे काढून बंद करावी. शक्य असल्यास व्हॅक्यूम पंपाचा वापर करता येतो.

बॅग सुरक्षित ठिकाणी ठेवा : मुरघासाच्या बॅगा उंच आणि कोरड्या ठिकाणी ठेवाव्यात. पावसाचे किंवा छतावरचे पाणी बॅगवर पडणार नाही, याची काळजी घ्यावी. उंदरांनी बॅग कुरतडल्यास त्यातून हवा आत जाऊन मुरघास खराब होऊ शकतो. त्यामुळे बॅगा जमिनीपासून तीन ते चार फूट उंचीवर लाकडी फळ्यांच्या प्लॅटफॉर्मवर ठेवाव्यात. जनावरांना किती मुरघास द्यावा? जनावरांच्या शरीराचे वजन आणि आहारानुसार मुरघासाचे प्रमाण ठरवावे. सर्वसाधारणपणे दुभत्या जनावराला दररोज १६ ते २० किलो मुरघासासोबत चार ते सहा किलो वाळलेला चारा किंवा कडब्याची कुट्टी देता येते. मुरघासासोबत संतुलित आहार देणेही आवश्यक आहे.



## गाय आणि म्हशीच्या चाऱ्यात ही खास गोष्ट मिसळा, दूध उत्पादन दुप्पट होईल !

गायी आणि म्हशींच्या संगोपनासाठी आणि देशातील दुधाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार दुधावर अनुदान देखील देते. असे असतानाही पशुपालकांना दूध बचतीतून पाहिजे तेवढा नफा मिळत नाही. चाऱ्याच्या दरात झालेली वाढ हेही यामागे एक प्रमुख कारण आहे. आज फार कमी प्रमाणात मोकळी कुरणे उरली आहेत, अशा स्थितीत पशुपालकांना हिरवा चारा विकत घेऊन जनावरांना द्यावा लागतो. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याची किंमत वाढल्या आहेत. अशा स्थितीत पशुपालक शेतकरी जनावरांना खास पशुखाद्य देऊ शकतात ज्यामुळे जनावरांच्या दुधाचे प्रमाण तर वाढेलच शिवाय पर्यावरणातील मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. व यातून पशुपालकांचे उत्पन्न देखील दुप्पट होईल.

मिथेन वायू ग्लोबल वॉर्मिंगसाठी कारणीभूत : रवंथ करणाऱ्या गायी म्हशीमुळे सर्वात जास्त मिथेन वायू उत्सर्जित होते असे मानले जाते. पशुपालनात ही एक मोठी समस्या आहे. तज्ज्ञांच्या मते, पशुपालक शेतकऱ्यांनी त्यांच्या दुभत्या जनावरांच्या चाऱ्यात काही बदल केले तर मिथेन वायूचे उत्सर्जन काही प्रमाणात कमी होऊ शकते.

कोणता चारा वापरावा? तज्ज्ञांच्या मते गायी आणि म्हशी त्यांच्या तोंडातून सर्वाधिक मिथेन



वायू उत्सर्जित करतात. ते ज्या प्रकारचा चारा खातात ते चघळण्याच्या पहिल्या टप्प्यात जास्त मिथेन वायू तयार करतात, आणि ते वातावरणात सोडतात. यामुळे वातावरणातील मिथेन वायूचे प्रमाण वाढते जे ग्लोबल वॉर्मिंग वाढवण्यास मदत करते. अशा परिस्थितीत जनावरांच्या आहारात 'लाल शेवाळ' वापरून मिथेन वायू निर्मिती कमी करता येते. लाल शेवाळापासून तयार केलेले खाद्य जनावरांना दिल्याने दुधाचे प्रमाणही वाढते.

लाल शैवालपासून प्राण्यांसाठी अन्न कसे तयार करावे? पशुपालक बाजारातून लाल शैवाल असलेले खाद्य विकत घेऊ शकतात. जनावरांचा चारा बनवताना रेड अल्गी किती प्रमाणात घालायचे याची काळजी घ्यावी. जनावरांच्या आहारात आवश्यकतेपेक्षा जास्त लाल शेवाळ टाकल्यास त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ, कट फीडमध्ये किती लाल शैवाल घालायचे हे लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे. तुम्ही बाजारातून पशुखाद्य विकणाऱ्या दुकानातून लाल शैवाल खाद्य विकत घेतल्यास, पशुखाद्य आणि त्याच्या वापराच्या पद्धती संबंधित सूचनाही त्याच्या पॅकेटमध्ये लिहिलेल्या सूचनांनुसार तुम्ही पशुखाद्य तयार करू शकता.

दुप्पट नफा कसा मिळवायचा? जर पशुपालकांनी लाल शैवाल असलेले विशेष पशुखाद्य विकत घेतले, तर फीड पॅकेटमध्ये नंबर असलेला एक कोड दिसतो. हा कोड कंपनीच्या अॅपवर जाऊन सबमिट करावा लागेल. या संख्यात्मक संहितेवरून हे कळते की पशुपालकांनी आपल्या जनावरांना किती लाल शैवाल खायला दिले आहे, ज्यामुळे मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे. त्याच्या मदतीने, पशुपालकाने किती मिथेन वायू उत्सर्जित होण्यापासून रोखला आहे हे देखील समजेल. त्याच आधारावर पशुपालकांना क्रेडिट क्रमांक मिळेल. यानंतर, पशुपालक या क्रमांकांची विक्री करून रोख नफा देखील मिळवू शकतात. अशा परिस्थितीत जनावरांच्या दुधाची विक्री करून आणि लाल शेवाळयुक्त खाद्य असलेला आहार जनावरांना देऊन शेतकरी दुप्पट कमाई करू शकतात.




### महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.

१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.

१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.

१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.

१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.

१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.

१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नेलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.

१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.

१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.

१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.

१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.

१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.

२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.

२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.

२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.

२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)

१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)

१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.

१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)

१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)

१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)

१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.

१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)

१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)

१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.

१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू

१९५० : श्रीधर फडके संगीतकार

१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)

१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)

१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)

१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.

१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)

१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)

१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)

१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )

१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)

२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)

२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)

२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

cmyk



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत

मंगळवार दि.८ सप्टेंबर २०२६ 



# मध्य महाराष्ट्रासाठी नवीन रेल्वे मंडळ स्थापन करावे!

## ०६ लाख ८२ हजार रुपयाचा १३ किलो ६५२ ग्रॅम गांजा जप्त; आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल



जालना । प्रतिनिधी

तेलंगणा आणि आंध्र प्रदेश राज्यातील २८ जिल्ह्यांकरिता रेल्वे विभागाच्या वतीने दोन मंडळे स्थापन करण्यात आली. नांदेड विभागातील जालना- छत्रपती संभाजीनगर -अंकाई पर्यंत चा दक्षिण मध्य रेल्वे विभागात समावेश असून वारंवार मागणी करू नये मध्य रेल्वे कडे या विभागास जोडले जात नाही. मराठवाडा विदर्भ आणि खानदेश चा काही भाग मिळून मध्य महाराष्ट्रासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करावे अशी एक मुखी मागणी मराठवाडा रेल्वे परिषदेत करण्यात आली. जालना रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने रविवारी ( ता. ०६) राष्ट्रीय हिंदी विद्यालयाच्या सभागृहात मराठवाड्यातील रेल्वेच्या प्रश्नांवर मंथन करण्यासाठी आयोजित मराठवाडा रेल्वे परिषदेचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे, राजाभाऊ देशमुख,नगरसेवक अक्षय गोरंट्याल, अर्जुन गेही ,व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, नंदकिशोर जांगडे, समितीचे अध्यक्ष सुभाष चंद्र देवीदान, महासचिव फेरोज अली, उपाध्यक्ष अशोक मिश्रा, सतीश पंच, कोषाध्यक्ष हिरालाल पिपरीये, नितीन चौधरी,इंजि. गोपाल भुरेवाल ,सूर्यनारायण गजबी, डॉ.राधेश्याम जैस्वाल, अॅड शिवराम सतकर , सतीश बगडिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

समितीचे अध्यक्ष सुभाषचंद्र देवीदान यांनी रेल्वेच्या बाबतीत मराठवाड्याला दक्षिण मध्य विभागाकडून सापत्न वागणूक सातत्याने मिळत असून मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्राच्या रेल्वे विकासासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी पुढाकार घ्यावा अशी आग्रही मागणी केली.

व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी यांनी जालना -खामगाव रेल्वे मार्गाची स्वातंत्र्य पूर्वीपासून मागणी असून आता कार्यान्वित होण्याच्या अपेक्षा पल्लवीत झालेल्या आहेत. उत्तर भारतात व्यापाराच्या दृष्टीने सदरील रेल्वे मार्ग तातडीने व्हावा अशी मागणी त्यांनी केली. प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी जालन्यात रेल्वे इंजिनिअरिंग संशोधन संस्था स्थापन होण्याची गरज व्यक्त केली. प्रास्ताविकात फिरोज अली यांनी जालना- खामगाव रेल्वे मार्गासह दुहेरीकरण, विकासासाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास , समितीचे सातत्याने सुरू असलेले प्रयत्न सांगून जालन्यात झोन कार्यालय झाले पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. सूत्रसंचालन आशीष रसाळ, सौरभ पंच यांनी केले तर हिरालाल पिपरीये यांनी आभार मानले. यावेळी अर्जुन गेही ,सतीश पंच , गौतम नहाटा आनंद बोरकर यांनी रेल्वेच्या विकासाबाबत मनोगत व्यक्त केले. परिषदेस अरविंद थोटे, ,अॅड. महेश धन्नावत, यांच्यासह छत्रपती संभाजीनगर, सिनखेडराजा ,देऊळगाव राजा, मानवत, परळी येथील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### लोकप्रतिनिधींवर दबाव वाढवा: रावसाहेब दानवे

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी परिषदेस भेट देऊन संवाद साधला.ते म्हणाले,अंकाई ते मुदखेड पर्यंत रेल्वेचे दुहेरीकरण, विद्युतीकरण, यासह नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यासाठी आपण पदावर असतांना संघर्ष केला. रेल्वे खाते आपल्याकडे आल्यानंतर अंकाई ते छत्रपती संभाजी नगर पर्यंत दुहेरीकरणाचा सर्वे करून तीन हजार कोटी रुपये मंजूर केले. वंदे भारत एक्सप्रेस साठी लागणाऱ्या विद्युतीकरणास साडेआठ हजार कोटी रुपये मंजूर करून विद्युतीकरण केले. नवीन रेल्वे गाड्या, पीट लाईन, जालना आणि छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाचे पुनर्निर्माणाची कामे सध्या सुरू आहेत. मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग लगत जलद गती रेल्वेसाठी सर्वे केला. मात्र अंतिम डि. पी. आर.ला मंजूरी मिळाली नाही. असे नमूद करत आता संसदेत आवाज उठवावा लागेल ,याकरिता रेल्वे संघर्ष समितीने लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण केला पाहिजेत असे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी याप्रसंगी सांगितले.

### जालन्यात झोनल कार्यालयासाठी प्रयत्न करणार : ना.प्रतापराव जाधव

देशाच्या मध्यभागी असलेल्या जालना शहरात रेल्वेचे विभागीय मंडळ कार्यालय स्थापन झाल्यास चारही दिशांना जाण्यासाठी मार्ग सुकर होईल.तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असून जालना- खामगाव रेल्वे मार्ग सोबतच झोनल कार्यालयासाठी केंद्रात प्रयत्न करणार असल्याची ग्वाही केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी उद्घाटन प्रसंगी दिली. जालना रेल्वे समितीतील ज्येष्ठांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा असून आपल्याकडे जालना- खामगाव रेल्वे मार्गाबाबत समिती सातत्याने पाठपुरावा करत असते असे नमूद करत समितीने सांगितलेल्या मागण्या केंद्र शासनाकडे लावून धरणार असल्याचे ना. जाधव यांनी सांगितले. स्टील, बियाणे उद्योगात अग्रेसर असलेले जालना शहर भविष्यात मध्यवर्ती जंक्शन म्हणून नावारूपास येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## शिक्षकांचा गौरव; श्री संत गजानन महाराज संस्थानचा स्तुत्य उपक्रम



जालना । प्रतिनिधी

शिक्षक दिनाचे औचित्य साधून सोनलनगर येथील श्री संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने दिनाक ६ सप्टेंबर २६ वार रविवार रोजी परिसरातील शिक्षकांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमाचे मुख्य प्रायोजक समर्थ सहकारी बँक मर्यादित, जालना होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. रविंद्र डुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून एम.जी. जोशी सर, रवी जोशी सर, सुचित कुलकर्णी, शिवाजी उबाळे व डॉ. मकरंद बोठे उपस्थित होते.

यावेळी तुकाराम काकडे सर यांनी ' ची गरज व वर्तमान', अशोक तोंडे सर यांनी 'मातृभाषेतून शिक्षण', तर अतुल हेलसकर सर यांनी 'इंग्रजी शिकण्याचे महत्त्व' या विषयांवर मार्गदर्शन केले. संस्थानच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती प्रमोद नाईक सर यांनी दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल तायडे सर यांनी केले. सूत्रसंचालन श्री अनिल झणझणे सर यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप अॅड. रविंद्र डुरे यांनी केला. आभार प्रदर्शन डॉ. मकरंद बोठे यांनी केले. ज्ञानदानातून समाज घडविणाऱ्या सोनलनगरातील सर्व शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## ध्वनिक्षेपकाचा आवाज न्यायालयाच्या नियमानुसार न ठेवल्यास पाथर्डी पोलिसांचा कडक कारवाईचा इशारा

पाथर्डी । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यातील सार्वजनिक आणि खाजगी कार्यक्रमांमध्ये ध्वनिक्षेपकाचा (स्पीकर) आवाज न्यायालयाच्या आदेशानुसार व शासन नियमांनुसार निर्धारित डेसिबलच्या मर्यादेतच ठेवणे बंधनकारक आहे, अन्यथा सार्वजनिक मंडळ असो किंवा खाजगी आयोजक सर्वांवर कोणतीही सवलत न देता एकसमान कडक कारवाई केली जाईल असा स्पष्ट आणि कडक इशारा पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिला आहे.

नुकतीच पाथर्डी तालुका डीजे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांची भेट घेऊन चर्चा केली त्यावेळी ते बोलत होते यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष नयूम शेख राजेंद्र दगडखैर अक्षय देहडराय आवेज शेख मिलिंद काळे निखिल काकडे ब्रह्मा शिरसाट संकेत बोरुडे आणि गोपनीय विभागाचे नागेश वाघ प्रमुख उपस्थित होते या चर्चेदरम्यान डीजे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आपण कर्ज काढून हा व्यवसाय सुरू केल्याची व्यथा मांडत न्यायालयाच्या नियमांचे पालन करून दोन बेस व दोन टॉप लावून मर्यादित आवाजातच ध्वनिक्षेपक वाजवू आणि कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घेऊ अशी ग्वाही दिली तसेच बाहेरच्या तालुक्यातील व जिल्ह्यातील डीजे मालक येथे येऊन गोंधळ घालतात त्यांच्यावर कडक कारवाई करून स्थानिक व्यावसायिकांना प्रशासनाने सहकार्य करावे अशी मागणी केली यावर बोलताना पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी स्पष्ट केले की कायदा मोडणाऱ्या कोणाचीही गय केली जाणार नाही न्यायालयाचे आदेश जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शक सूचनांचे सर्वांनी तंतोतंत पालन करून सण-उत्सव आनंदाने साजरे करावेत नियमांचे उल्लंघन झाल्यास ध्वनिक्षेपक चालकांची सर्व यंत्रणा व साहित्य जप्त करून थेट गुन्हे दाखल केले जातील तसेच रात्री १० नंतर कोणत्याही परिस्थितीत ध्वनिक्षेपक वाजवण्यास पूर्णपणे बंदी राहील याची सर्वांनी काटेकोर काळजी घ्यावी असे आव्हान केले.

## कत्तलीसाठी नेणारे २८ गोवंशांची सुटका; कंटेनरसह आरोपी अटकेत

जालना। प्रतिनिधी

परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे परतूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करून कत्तलीच्या उद्देशाने अवैधरित्या वाहतूक करण्यात येत असलेल्या २८ गोवंशांची सुटका केली. या कारवाईत गोवंशांची वाहतूक करणारा कंपनीचा कंटेनर (क्र. ०४ ८८०२) जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी गु.र.नं. ०४२९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३(५). महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम. १९७६ तसेच महाराष्ट्र प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील



संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या २८ गोवंश व कंटेनर असा एकूण सुमारे १३५.९० लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदर प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते हे करीत आहेत.गुरंन- ०४२९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३ (५). महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच महाराष्ट्र प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० मधील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंग संधू मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत. पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते. पोलीस कॉन्स्टेबल खंदारे. पो. कॉ. जाधव (ब.क्र. १४१९). गीते. गोविंद पवार, ज्ञानेश्वर वाघ. परमेश्वर

## महाराणा प्रताप चौकातील अतिक्रमणावर शिवसेनेचा एल्गार

बीड । प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक १३ मधील धानोरा रोडवरील महाराणा प्रताप चौक परिसरातील अतिक्रमण तात्काळ हटवून नाल्यांची स्वच्छता करावी, या मागणीसाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, उल्हास गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा संघटक रतन गुजर यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे धाव घेतली. नागरिकांच्या समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन आठ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास नगरपालिकेला टाळे ठोकण्याचा इशारा रतन गुजर यांनी दिल्याने नगर परिषद प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली.

महाराणा प्रताप चौक परिसरात मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. धानोरा रोडपासून करपरा नदीपर्यंत सुमारे ४० फूट रुंदीचा रस्ता असताना अतिक्रमणामुळे प्रत्यक्षात केवळ १० फूट रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध राहिला आहे. परिणामी या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना तसेच वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत हे.दरम्यान, परिसरातील मोठा नाला करपरा नदीला जोडलेला असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा व घाण साचली आहे. नाले पूर्णपणे बुजल्याने पावसाळ्यात नाल्याचे पाणी रस्त्यावर येऊन परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण होण्याची शक्यता आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस.आर. पाटील, सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३३०/२०२६**

**लोचनाबाई भ्र. खंडू शेवाळे व इतर ०४ विरुध्द निरंक**

**मार्फत अॅड. एस. जे. लोंढे**

अर्जदार -१. लोचनाबाई भ्र. खंडू शेवाळे, वय ८६ वर्षे, धंदा घरकाम, २. रघुनाथ पि. खंडू शेवाळे, वय ७१ वर्षे, धंदा मजुरी, ३. रामकृष्ण पि. खंडू शेवाळे, वय ६८ वर्षे, धंदा मजुरी ४. कांचन भ्र. बलभीम शेवाळे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, ५. शरद पि. बलभीम शेवाळे, वय ४३ वर्षे, धंदा मजुरी, सर्व रा. कांतीनगर पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.

विरूध्द गैरअर्जदार :-कोणीही नाही

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत खंडु पि. पांडु शेवाळे, रा. क्रांतीनगर पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी खंडू पि. पांडु शेवाळे यांचा मृत्यु दिनांक १०/०६/२०१४ रोजी रा. क्रांतीनगर पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाले आहेत. तसेच मयताचे आईवडिल यापुर्वीच मयत झालेले आहेत व मयताचा एक मुलगा बलभीम पि. खंडु शेवाळे हा दिनांक १९/०५/२०१६ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र.०१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.०२ व ०३ हे मयताचे मुले. तसेच अर्जदार क्र. ०४ ही मयताचा मयत मुलगा बलभीम खंडू शेवाळे यांची पत्नी असुन मयताची सुन आहे. अर्जदार क्र. ०५ हा मयताचा मयत मुलगा बलभीम खंड शेवाळे यांचा मुलगा असुन मयताची नातु आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत खंडू पि. पांडु शेवाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ माहे सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १२ ऑक्टोबर २०२६.

आदेशावरुन,

स्वाक्षरीत /-
क. लिपीक

स्वाक्षरीत /-
**(सहाय्यक अधिक्षक )**
सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री पी.एस. घोडके, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४७७/२०२६**

**उषा विरूध्द निरंक**

अर्जदार :- १) उपा भ्र. राजू ससाणे वय ७८ वर्ष, धंदा घरकाम रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि.बीड. २) सवित्ता भ्र. सचिन ससाणे वय ४० वर्ष, धंदा घरकाम रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि. बीड. ३) सृष्टी पि. सचिन ससाणे वय १९ वर्ष, धंदा शिक्षण, रा. भिम नगर, रांजणी, ता. गेवराई जि. बीड. ह.मु. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता.जि.बीड. ४) सिध्दार्थ पि. सचिन ससाणे वय १७ वर्ष, धंदा शिक्षण, रा. ऑफिसर कॉलनी, इंदिरा नगर, बीड ता. जि. बीड. अर्जदार ४ करीता अ.पा.क. अर्जदार क्र. २

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत, वरील अर्जदार यांनी या न्यायालयात सचिन पि. राजु ससाणे रा. भिमनगर रांजणी, ता. गेवराई, जि. बीड व मृत्यूसमयी चा पत्ता बीड, ता.जि. बीड यांचा मृत्यु सिध्दीविनायक नेत्रालय बीड ता. जि. बीड येथे झाला आहे. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत सचिन पि. राजु ससाणे यांचा मृत्यु दिनांक २१.०७.२०२६ रोजी झाला आहे. वरील अर्जदार १ ते ४ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सचिन पि. राजु ससाणे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार १ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार १ ते ४ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सचिन पि. राजु ससाणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७.०९.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९.१०.२०२६ आहे.

आदेशावरून,

स्वाक्षरीत /-
क. लिपीक

स्वाक्षरीत /-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

## नांदेड-बीदर महामार्गावरील अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त

### पादचारी रस्ताही गायब, सा.बां.विभाग व नगर पालिका हात झटकून मोकळे.,मात्र पोलिस 'हप्ते ' गोळा करण्यात मशुल

उदगीर : सुनिल तांदळे

उदगीर मधून गेलेल्या नांदेड - बीदर तसेच रेणापूर - देगलूर या राष्ट्रीय महामार्गावर दुतर्फा अतिक्रमण मोठ्याप्रमाणात झाले आहे हे कुणीही नाकारू शकत नाही.मात्र , सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर पालिका प्रशासन याकडे 'अर्थपूर्ण ' दुर्लक्ष करत असल्याने शहरातील नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांना पादचारी रस्ता 'असून अडचण नसून खोळंबा' अशी झाली आहे. सदर राष्ट्रीय महामार्ग उदगीर शहरातून गेला असला तरी त्यावर ना सा.बां विभागाचे लक्ष नसल्यासारखे वागत आहेत तर दुसरीकडे नगर पालिका प्रशासन आपला गल्ला कसा भरता येईल हेच पाहत आहे की काय असे वाटते. खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना रस्त्यावर उभे करून त्यांच्या कडून 'हप्ता' गोळा करण्याचा धंदाच उदगीर शहर व ग्रामीण पोलीसांकडून 'अवैद्य'रित्या सुरूच आहे. हे येथे खेदाने नमूद करावे लागत आहे.

यापुढेही जाऊन सा.बां.विभागाने तयार केलेल्या या राष्ट्रीय महामार्गावर उदगीर बसस्थानकासमोरही हातगाडे,आटो, खाजगी जीप यांनी २० फूट रस्त्यावर जागा कब्जा केल्यासारखे दिसून येते. या अतिक्रमण करणाऱ्यावर न.पा. वा पोलीस कसलीच कडक



कारवाई करत नाही तर विशेष प्रकारचे संरक्षणच देत आहे की काय अशी शंका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तीन राज्यांच्या सीमेवरील उदगीर शहर हे औद्यौगिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे शहर म्हणून राज्य व देशपातळीवर तसेच इतिहासात नोंद असलेले शहर आहे. दळणवळणाच्या सोयी सुविधा जसे रेल्वे,रस्ते मोठ्या व महत्वाच्या शहरांशी जोडलेले आहेत. सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये या शहरात आहेत. जिल्हा होण्याची सर्व कार्यालये उपलब्ध आहेत. असे असतानाही या शहरात अजून बस स्थानक तयार होत नाही.मागील पाच - सहा वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे.जिल्हयातील अहमदपूर, निलंगा, जळकोट,औसा व लातूर बसस्थानके उदगीर नंतर नव्या रूपात सुरू देखील झाले आहेत,हे नमूद करणे महत्वाचे वाटते. भविष्यात येणाऱ्या काळात उदगीर जिल्हा होईलच असे आत्ताच सांगता येत नाही.तरी पण रस्त्यावरून पायी चालणाऱ्या वृध्द महिला व पुरुषांबरोबरच शाळकरी मुलां-मुलींच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी राजकीय पुढारी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस अधिकारी आत्ताच्या राष्ट्रीय महामार्गावर पायी चालत जाऊन काय परिस्थिती आहे हे पाहण्याचे आव्हान ज्येष्ठ नागरिकांनी केले आहे.

cmyk

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

मंगळवार दि.०८ सप्टेंबर २०२६ | ६

# स्टोन क्रशरवर प्रशासनाचा हातोडा

## परवान्यांचा खेळ पडला महागात! प्रशासनाचा स्टोन क्रशरवर हातोडा; आष्टी तालुक्यातील सर्व क्रशर सील

आष्टी । प्रतिनिधी

आवश्यक परवाने, कागदपत्रे व करसंबंधित पूर्तता न करणाऱ्या स्टोन क्रशरधारकांविरोधात प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी, बीड तसेच उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांच्या आदेशान्वये आष्टी तालुक्यातील नियमांची पूर्तता न करणारे स्टोन क्रशर मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सील करण्यात आले आहेत.

स्टोन क्रशर परवाना, खदान परवाना, डीएमएफ चलन, एकरकमी रूपांतरित कर भरणा तसेच ए-ढझड झ-डड चा वापर यासह आवश्यक बाबींची पूर्तता करण्याबाबत संबंधित क्रशरधारकांना



प्रशासनाकडून वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अनेकांनी आवश्यक परवान्यांचे नूतनीकरण न करता तसेच कागदपत्रांची पूर्तता न करता क्रशर सुरू ठेवल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

### कागदपत्रे व परवान्यांची पूर्तता न करणाऱ्यांवर थेट कारवाई; सील तोडून क्रशर सुरू केल्यास फौजदारी गुन्हा

यानंतर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारत संबंधित स्टोन क्रशर सील करण्याची धडक मोहीम राबविली आहे. त्यामुळे तालुक्यातील क्रशर व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

**सील तोडले तर थेट फौजदारी कारवाई!**

सील करण्यात आलेले क्रशर पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता लक्षात घेऊन तहसील प्रशासनाने क्रशरधारकांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. प्रशासनाने केलेले सील तोडून क्रशर सुरू केल्यास अथवा सील केलेला क्रशर सुरू असल्याचे आढळून आल्यास संबंधित चालकाविरुद्ध MLRC नियमांनुसार तसेच लागू फौजदारी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया केली जाईल, असा स्पष्ट इशारा तहसीलदारांनी दिला आहे. सील केलेल्या स्टोन क्रशरशी संबंधित कोणतीही नियमबाह्य कृती आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्टोन क्रशर चालकाची राहील, असे तहसीलदार, आष्टी यांनी प्रसिद्ध केलेल्या प्रेस नोटमध्ये स्पष्ट केले आहे. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या क्रशर व्यवसायाला चाप बसणार का, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खुनाच्या प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

फिर्यादी यांनी दि. २३ नोव्हेंबर २०२३रोजी दुपारी ३:०० वा. सुमारास त्याची आई कौशल्याबाई किसन राऊत वय ८० वर्ष हिस तिचा मुलगा आरोपी राहुल बालासाहेब राऊत वय २८ वर्ष लोणगाव याने भाकर बनवून दिली नाही म्हणून दगडाने व लाकडाने डोक्यात मारून जीवे ठार मारले म्हणून पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे तक्रार दिली. ज्यावरून आरोपीविरुद्ध गु.र.नंबर.२६१/२०२३ कलम ३०२ भा.दं.वि.प्रमाणे गुन्हा दाखल झाला त्यानंतर आरोपीस न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश केला.



प्रकरणात तपास होऊन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. ज्यास सेशन केस नंबर. ३९/ २०२४ हा देण्यात आला. त्यानंतर आरोपी तर्फे कलम ४८२ बी.एन.एस.एस.अन्वये नियमित जामीन अर्ज मिळणे बाबत अर्ज दाखल करण्यात आला होता. बचाव पक्षाचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून.जिल्हा व सत्र न्यायाधीश माजलगाव श्रीमती.परदेशी मॅडम यांनी आरोपी राहुल बालासाहेब राऊत रा.लोणगाव ता.माजलगाव जी. बीड यास नियमित जामीन मंजूर केला.आरोपीच्या वतीने ॲड. उद्धव दुर्गादासराव मोरे माजलगाव यांनी काम पाहिले व त्यांना ॲड.व्ही.ए.सोळंके यांनी सहकार्य केले.

# 'आरक्षण द्या, अन्यथा गप्प बसणार नाही' माजलगावात धनगर समाजाचा एल्गार

### तहसील कार्यालयासमोर सकल धनगर समाजाची जोरदार निदर्शने; सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

**एसटी आरक्षणाची अंमलबजावणी, बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा; अहिल्यादेवींच्या नावाने रेल्वे स्थानक करण्याची मागणी**

माजलगाव । प्रतिनिधी

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, तसेच समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल धनगर समाजाच्या वतीने सोमवार (दि. ७) तहसील कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व तहसील कार्यालयांसमोर करण्यात येत असलेल्या आंदोलनाचा हा एक भाग होता.

यावेळी धनगर समाजाच्या मागण्यांसाठी कार्यकर्ते मोठ्या संख्येने



एकवटले होते. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत 'धनगर समाजाला न्याय मिळालाच पाहिजे', 'एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करा' अशा घोषणांनी तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.

धनगर आरक्षणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात राज्य शासनाने पूर्ण ताकदीने बाजू मांडावी, दि. ८ सप्टेंबरपूर्वी ठोस प्रतिज्ञापत्र दाखल करावे आणि या प्रकरणासाठी सक्षम वकिलांची नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच न्यायालयाचा निर्णय ◀◀ पान ३ वर

# पाणबुडी मोटार चोरणारे ४ आरोपी एलसीबीने पकडले

बीड / शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तागडगाव परिसरातून शेतकऱ्यांच्या शेतातील पाणबुडी मोटारी चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी तागडगाव येथील पाणबुडी मोटार चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले असून यात एकूण चार आरोपी निष्पन्न करून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

तागडगाव शिवारातील शेतातून अज्ञात चोरट्यांनी पाणबुडी मोटारी चोरून नेल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १९८/२०२६ व २०१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले होते. परिसरातील



शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याने पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू केला होता.

स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक माहिती व गोपनीय खबऱ्यांच्या आधारे तपास चक्र फिरवून संशयितांचा शोध घेतला. तपासादरम्यान योगेश गोरख पोकळे (वय ३६), राजेश रंगनाथ तांबारे (वय २२) आणि सलिम बानूभाई शेख (वय ३०, तिघेही रा. तागडगाव, ता. शिरूर, जि. बीड) यांनी या मोटारी चोरल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी चोरलेल्या पाणबुडी मोटारी गावातीलच भरत रामभाऊ पवार (वय ३८, रा. तागडगाव) याला विकल्याचे समोर आले. पोलिसांनी भरत पवार याच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आहे. या दोन्ही गुन्ह्यांत (गु.र.नं. १९८/२०२६ आणि २०१/२०२६) या चौघांचाही सहभाग उघडकीस आला असून त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. सदरची धडक कारवाई बीडचे पोलीस ◀◀ पान ३ वर

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी हजारो शेतकरी घेणार माजलगाव धरणात जलसमाधी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मंगरूळ -१ येथे हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत माजलगाव धरणाच्या उंची वाढविण्याच्या विरोधात २२ गावचे पुनर्वसीत शेतकरी आक्रमक होत साळींबा उपसा सिंचन ला आमचा पूर्ण पाठिंबा आहे.तसेच माजलगाव धरणाची उंची न वाढवता गाळ काढून पाणी क्षमता वाढवावी माजलगाव धरणाची उंची वाढविण्याच्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मंगरूळ नंबर १ येथे हजारो शेतकऱ्यांची बैठक पार पडली. २२ गावांतील पुनर्वसित शेतकऱ्यांनी धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत हा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मान्य करणार नसल्याचा आक्रमक पवित्रा घेतला.

साळींबा उपसा सिंचन योजनेला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र धरणाची उंची वाढविण्याऐवजी माजलगाव धरण क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ काढून पाणीसाठा वाढवावा, अशी शेतकऱ्यांची ठाम मागणी आहे.धरणातील गाळ काढल्यास शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्याची गरज भासणार नाही तसेच शासनाच्या निधीचा योग्य वापर होईल. त्यामुळे धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय तात्काळ रद्द करून गाळ काढण्याच्या कामाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने संबंधित विविध शासकीय कार्यालयांना निवेदन देऊन धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात येणार आहे.शासनाने हा निर्णय मागे घेतला नाही, तर दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी माजलगाव धरणाच्या कमानीच्या आत हजारो शेतकऱ्यांना घेऊन जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला.या प्रश्नावर आमदार प्रकाश सोळंके आणि ओमप्रकाश शेटे यांच्या भूमिकेबाबतही शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून, स्पष्टपणे जनतेसमोर आगामी भूमिका सांगावी,अशी मागणी करण्यात आली.तसेच माजलगाव व गेवराई तालुक्यातील ◀◀ पान ३ वर

# बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेनेचा एल्गार 'तुम से ना हो पायेगा' जनआंदोलनाने परिसर दणाणला!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, पाणी, वीज, आणि जलजीवन मिशनमधील भ्रष्टाचाराविरोधात आणि यांसह असंख्य प्रश्नावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'तुम से ना हो पायेगा' हे तीव्र जनआंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनादरम्यान महायुती सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर चांगलाच दणाणून गेला होता.

या आंदोलनात विरोधी पक्षनेते



आ.अंबादास दानवे, धाराशिव-कळंबचे आमदार कैलास पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख परशुराम जाधव, मुजीब भाई शेख, मराठवाडा पदवीधर समन्वयक दिलीप घुगे, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, रत्नाकर शिंदे, कुंडलिक खांडे, महिला आघाडीच्या मीराताई नवले गोरख शिंगण,नवनाथ प्रभाळे,संजय महाद्वार यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जुने रजाकार गेले, हे नवीन रजाकार आले: अंबादास दानवे

### जुने रझाकार गेले, आता हे भाजपचे नवीन रझाकार आले: आ.अंबादास दानवे

### हे 'सॅटेलाइट' सरकार, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ: आ. कैलास पाटील

आंदोलनाला संबोधित करताना अंबादास दानवे यांनी सरकारवर अत्यंत तिखट शब्दांत हल्ला चढवला.

१७ सप्टेंबरला मराठवाडा स्वतंत्र झाला. जुने रजाकार गेले आणि आता हे नवीन रजाकार सत्तेत आले आहेत. बीड जिल्ह्यासाठी जाहीर केलेल्या ३७-३८ घोषणांचे पुढे काय झाले? कंकालेश्वर, राक्षसभूवन, आणि परळी वैजनाथ देवस्थानचा विकास अद्याप रखडलेलाच आहे. बीडमध्ये १५ दिवसांतून एकदा पाणी येते. जलजीवन मिशन ही या सरकारमधील सर्वात मोठी भ्रष्ट योजना ठरली असून हे सरकार जनतेचे नसून केवळ ◀◀ पान ३ वर

# तहसील कार्यालयाच्या मधोमध नालीचे काम बीॲण्डसी कार्यालयाच्या डोळ्यांसमोर निकृष्ट कामाचा आरोप



बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालयाच्या मध्यभागी असलेल्या रस्त्याच्या कडेला नालीचे काम सुरू असून, या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, या कामाच्या अगदी बाजूलाच सार्वजनिक बांधकाम विभागाचे (BC) कार्यालय असतानाही कामाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान नालीच्या बांधकामात काँक्रीटऐवजी दगडांचा वापर करण्यात आल्याचे, नालीमध्ये आवश्यक लोखंडी गजांचा वापर दिसून येत नसल्याचे तसेच नालीच्या तळाला योग्य पद्धतीने पेचिंग करण्यात आले नसल्याचे दिसत आहे. तसेच नालीच्या दोन्ही बाजूंना करण्यात येणारी भरही व्यवस्थित आणि मजबूत पद्धतीने केली जात नसल्याचा आरोप आहे. नालीमध्ये सांडपाणी साचलेले असून, सुरू असलेल्या बांधकामाची मजबुती आणि भविष्यातील टिकाऊपणाबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत. हे काम मंजूर अंदाजपत्रक, तांत्रिक आराखडा आणि संबंधित विभागाच्या बांधकाम नियमांनुसार होत आहे का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांच्या अगदी मध्यभागी हे काम सुरू आहे. त्यातच काही अंतरावर इउ कार्यालय आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकारी व अभियंत्यांच्या देखरेखीखाली हे काम होत असतानाही अशा प्रकारचे काम सुरू असल्यास त्याची जबाबदारी निश्चित कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाची तातडीने पाहणी करून प्रत्यक्ष मोजमाप, अंदाजपत्रक आणि तांत्रिक निकषांची तपासणी करावी. काम निकृष्ट आढळल्यास संबंधित ठेकेदारासह जबाबदार अधिकारी व अभियंत्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# उद्योजक भरत गिते यांनी भगवानगडावर घेतले दर्शन

## महंत डॉ.न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराजांची घेतली सदिच्छा भेट

बीड । प्रतिनिधी

उद्योगविश्वात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आणि 'ल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे 'तोरल इंडिया ग्रुप'चे संचालक, बीड जिल्ह्याचे सुपुत्र, उद्योजक भरत गिते यांनी शुक्रवारी (दि.४) भगवानगड येथे संत भगवानबाबा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन मठाधिपती महंत डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान भगवानगडावर साकारल्या जाणाऱ्या भारतातील सर्वात मोठ्या श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराच्या बांधकामाची



माहिती महंत नामदेव शास्त्री महाराजांनी भरत गिते यांना दिली. मंदिराच्या भव्य संकल्पनेपासून ते प्रत्यक्ष कामाच्या प्रगतीपर्यंतचा तपशील त्यांनी यावेळी मांडला. भगवानगड ही केवळ अध्यात्माची भूमी नसून शिक्षण, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र म्हणून कार्यरत आहे. गडावर विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली स्पर्धा परीक्षा अभ्यासिका, तसेच वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वाटचाल याविषयीही शास्त्री महाराजांनी माहिती दिली. यावेळी महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या हस्ते संत भगवानबाबांची प्रतिमा भेट देऊन भरत गिते यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री, तोरल इंडिया कंपनीचे व्यवस्थापक निलेश जायभाये, लेट्सअप मराठीचे इंजि. जनार्धन जायभाये, उद्योजक केशव नागरगोजे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **उद्योगाच्या प्रगतीसोबत संस्कारांची नाळ जोडणारी भेट**
>
> भगवानगडाच्या पावन भूमीत उद्योगविश्वातील एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाची झालेली ही भेट आधुनिक उद्योगक्षमता, शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संतपरंपरा यांचा एक प्रेरणादायी संगम ठरली. उद्योगाच्या उत्तुंग प्रगतीसोबत अध्यात्म आणि मूल्यांची नाळ घट्ट ठेवणारी ही भेट ठरली आहे.

# गणेशोत्सव शांततेत साजरा करावा -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

आपला गणेशोत्सव हा एकात्मतेचे प्रतीक आहे. या उत्सवामध्ये आपण सर्वांनी सर्वधर्मसमभाव राखत समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेतले पाहिजे. तसेच उत्सवादरम्यान कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही याची सर्वांनी काटेकोर दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या बैठकीस जिल्ह्यातील श्रीगणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समितीच्या सदस्यांसह पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी, पोलिस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी यांची उपस्थिती होती.

गणेशोत्सव काळात शहरात तसेच जिल्ह्यात शांतता व सलोख्याचे वातावरण राहावे, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. गणेशोत्सवातील विशेष दिवशी जिल्ह्यातील सर्व मद्यविक्रीच्या अनुज्ञप्तीही बंद ठेवण्यात येणार आहेत. गणेशोत्सवात गणेश मुर्ती विसर्जनाचा मुख्य भाग असून पाण्याच्या कमतरतेमुळे काही कृत्रीम व्यवस्था तयार करता येईल का याची सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी चाचपणी करावी. गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी इको फ्रेडली गणेश उत्सव साजरा करता येईल का यावर काम करावे. या उत्सवाचा आनंद सर्वांना घेता यावा आणि समाजात एकतेची भावना दृढ व्हावी, यावर जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी विशेष भर दिला. गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानगीसाठी तसेच सुरक्षेच्या कारणास्तव एक मंडळ एक पोलिस ही संकल्पना जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. तसेच गणेश मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची सोय करावी आणि पोलिस विभागांच्या विविध सुचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी केले. बैठकीत उत्सवाच्या नियोजनाबाबत आणि सुरक्षेच्या उपाययोजनांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच शांतता समितीच्या सदस्यांनी व श्रीगणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थित केलेल्या समस्याची सोडवणूक करण्यात आली.

# १६ सप्टेंबरला उपजिल्हाधिकारी कार्यलयावर विभागातील शेतकऱ्यांचा दुष्काळी मोर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे आणि यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे बीडजिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. यावर्षीही पाऊस न पडल्याने शेतकरी संकटात आहे. उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून खत, औषधे, मजुरी, पेट्रोल-डिझेल तसेच बैलांच्या टाकण्याच्या कडब्याचे दर वाढले आहेत. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुष्काळाचा दाखला देत शेतकऱ्यांना अन्नधान्याच्या माध्यमातून मदत केली जात होती, त्याच धर्तीवर आजच्या संकटातही शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी स्वतःच्या रक्ताचे पाणी करून, दिवस-रात्र कष्ट करून ऊस पिकवतो आणि तोच ऊस कारखान्यांना देतो. या शेतकऱ्यांच्या घामाच्या आणि कष्टाच्या जीवावर साखर कारखाने चालतात, हे कारखानदारांनी विसरता कामा नये. त्यामुळे सध्याच्या भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk